VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

ISSN 2320-6128

# Indian Thinker

International Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Editor In Chief

ISSN [illegible]

# Indian Thinker

International Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Editor In Chief
Arun B. Godam

**Vol I Issue VI, Year III ( Half Yearly) Feb. 2016 to July. 2016**

**Editorial Office :**

Khadgaon Road, Kapil Nagar, Latur, Dist. Latur 413512 (M.S.) India.

**Contact :-**

Arun B. Godam

8149668999, 8483959442

**E-mail :**

hitechresearch11@gmail.com.

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Hanumant Mane**
R.Guide & Head. Dept. of Marathi
Shivchatrapati College
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

**Dr. N.J. Waghmare**
Res. Guide & Head,Dept. of Pali
Govt. Banalkelar College
Shivani, (M.P.)

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography,
Smt. S. D. M College
Latur, Dist. Latur (M.S.)

**Dr U.V.Panchal**
H.O.D. Dept of Commerce,
Deogiri College
Aurangabad, Dist. Aurangabad

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W). Dist. Mumbai

**Dr M.U. Yusuf**
Assistant Professor
Dept of Commerce
Sir Sayyed College
Auranbadad. Dist. Aurangabad

**DEPUTY EDITORS**

**B.J. Hirve**
Dept. of botany
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed. (M.S.)

**S.M. Dansode**
Dept. of Sociology,
Shri Shiv Shahu Mahavidalaya
Sarud, Tq. Shahuwadi, Dist. Kolhapur

**Maimanat Jahan Ara**
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr. B.T. Lahane**
Principal, Head. Dept. of English,
Sambhajirao Kendre College,
Jalkot, Dist. Latur (M.S.)

Shaurya Publication,
Latur

**Price : Rs. 250/-**

www.rjournals.co.in

| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Major Steps of Economic Reforms Taken by Government of India | Dr.Pratap J. Phalphale | [illegible]-12 |
| 2 | Effect Of Conditioning Exercise On The Physical Components Among Sedentary Students | Gangadhar Sarode | 13-17 |
| 3 | Health Status Of Woman's In Gulbarga District | Mr. Shekarraj Tippanna | 18-22 |
| 4 | Isolation of Klebsiella pneumoniae from pus and its antibiogram | Kagne S.R. | 23-28 |
| 5 | Female Feticide: A Social problem in India | Shri. Bansode S. S. | 29-35 |
| 6 | MGNREGA: A Milestone for Women Empowerment | Rajendra Kumar, Dr.Alok Kumar | 36-41 |
| 7 | Childlessness Women In India: A Sociological Observation | Dr.Sanjukumar Minchy | 42-49 |
| 8 | Awareness And Knowledge Of Diversity Issues In India | Dr.Sharanagouda .S .Hiregouda | 50-58 |
| 9 | Problems And Prospect Of Nssk Sugar Industry Workers | Dr. Narasappa Maruti | 59-63 |
| 10 | कबीर : विद्रोह और समाजदर्शन | डॉ. बळीराम संभाजी भुक्तरे | 64-66 |
| 11 | स्वयंसहाय्यता बचत गट | डॉ. इ.जे. हेळगे | 67-74 |
| 12 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोकपत्रकारिता | डॉ. सविता मुंढे | 75-78 |
| 13 | महाराष्ट्रातील लिंग निगडित मानवी विकास निर्देशांक | प्रा. आर.के. नाळे | 79-86 |
| 14 | "काय सांगता? एस. टी. नव्हतंच?" | प्रा. सुभाष रामराव यादव | 87-90 |
| 15 | राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकाचा आढावा | प्रा.यादव जरीचंद बाळासाहेब, डॉ. मुळे एम.पी. | 91-94 |
| | अनेक वर्षांनंतर आपत्ती-ही आपत्तीच ! | प्रा. संयज बी. नवले | 95-97 |
| | नागरिकरणाचा समाजजीवनावर होणारा परिणाम : एक भौगोलिक अभ्यास | प्रा. पी.टी. वाघमारे, प्रा. ए.पी. देसाई | 98-108 |
| | महाराष्ट्राच्या सामाजिक विकासात वृत्तपत्राचे योगदान | प्रा. डॉ. बालाजी शिंदे | 109-112 |
| | लोकसाहित्यातील लोककथेचे स्वरुप | प्रा. राजू नागनाथ नवले | 113-117 |
| | दीर्घ पल्ल्याचे सत्र मांडणारी कविता : आले ढग गेले ढग | डॉ. युवराव धबडगे | 118-12 |
| | भारतातील प्रादेशिक वादाचे स्वरुप | प्रा.डॉ.रत्नाकर बाबुराव लक्षटे | 123-12 |
| | [illegible] | डॉ.परमेश्वर गंगाधर धुमाळे | 128-13 |


ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded

Half yearly Research Journal (123) ISSN - 2319- 8648
Vol I Issue VII, Feb. 2016 to July, 2016

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

# भारतातील प्रादेशिक वादाचे स्वरूप

प्रा.डॉ.रत्नाकर बाबुराव लक्षटे
(राज्यशास्त्र विभाग प्रमूख)
देगलूर महाविद्यालय, देगलूर

21

## Research Paper - Political sci.

### प्रस्तावना

प्रदीर्घ अशा संघर्षानंतर १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वतंत्र्य प्राप्त झाले. हे स्वतंत्र्य प्राप्त करण्यासाठी अनेक राष्ट्रभक्त आणि क्रांतीकारकानी आपल्या प्राणाची आहूती दिली. त्यामुळे हे स्वतंत्र्य आपणास पाहता व अनुभवता आले. एकंदरीत विचार करता 'राष्ट्रीय एकात्मता' ही बाव अग्रीम मानून अनेकांनी आपले योगदान दिले. त्यामूळेच स्वतंत्र भारताचे स्वपन प्रत्यक्षात उतरले. स्वतंत्र भारताच्या पहिल्या दिवशी पं.नेहरूनी केलेले भाषण साज्या जगात नावाजले गेले. थोडक्यात राष्ट्रीय एकात्मता मजबूत झाल्यानंतर ब्रिटिशांना भारताला स्वातंत्र्य देवून देश सोडवा लागला, एवढी प्रचंड ताकत आपल्या राष्ट्रीय एकात्मतेत होती, हे पहिल्यांदा सिध्द होते. तात्पर्य हा आहे की, राष्ट्रभिमान, राष्ट्रसेवा, राष्ट्रप्रेम या भावनेने सारा देश तत्कालीन काळात एकात्म झाला होता. परंतू स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ही राष्ट्रीय एकात्मतेची भावना ओसरत गेली.१ हे आपल्याला पहिल्यांदा लक्षात येते. सबब भारतीय लोकशाही म्हणा किंवा राष्ट्रीय एकात्मता म्हणा या दोन्ही बावीसमोर काही नवे प्रश्न आणि आव्हाने निर्माण झाली आहेत. भारताच्या स्वातंत्र्याच्या प्रारंभिक काळानंतर एक एक समस्या डोके वर काढू लागली, त्यातीलच एक महत्वपूर्ण समस्या म्हणजे भारतातील प्रादेशिकवाद होय. विशेषत: गेल्या ६०/६५ वर्षाच्या काळात आपल्या राष्ट्रात अनेक समस्या निर्माण झाल्या. किंबहूना भाषावाद, धर्मवाद, जातीयता, प्रदेशवाद असे कांही संघर्ष निर्माण झाले.२ यातीलच एक महत्वपूर्ण समस्या म्हणजे भारतातील प्रदेशवाद होय. अशा प्रादेशिकवादाचे स्वरूप सुध्दा समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. परंतु हे स्वरूप समजून घेण्याच्या अगोदर प्रस्तूत शोध निबंधासाठी पुढील संशोधन आराखड्याचा विचार केला आहे.

### संशोधनाची व्याप्ती (Scope of The Studey)

[illegible] निर्माण झालेल्या प्रादेशिकवादा बाबतचा ओझरता आढावा

ISSN - 2319- 8648
Vol I Issue VII, Feb. 2016 to July. 2016
ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

घेतला आहे.

संशोधनाची उदिष्टे (Objects of Research)

१) भारतातील प्रादेशिक वादाचे स्वरुप स्पष्ट करणे.

२) भारतातील प्रादेशिकवादा बावतची ऐतिहासिक पार्श्वभूमी तपासणे.

गृहतिके : (Hypothesis)

१) भारतातील प्रादेशिकवाद स्वातंत्र्यपुर्व काळापासून आहे.

२) राज्याच्या स्वार्थी हेतूतून प्रादेशिक भावना वळकट झाल्या.

३) प्रादेशिकवाद हे राष्ट्रीय एकात्मतेसमोर प्रमूख आव्हान ठरत आहे.

संशोधन समस्या (Research Problem)

प्रादेशिकतेमूळे भारतीय एकात्मतेसमोर निर्माण झालेल्या समस्येचे अध्ययन करणे.

तथ्य संकलन (Data Collection)

प्रस्तूत शोधनिवंधासाठी प्रलेखिय साधनांचा वापर करण्यात आला असून शक्यतो प्रकशित साधनावर भर दिला आहे.

अभ्यासाची पध्दती (Research Methdology)

प्रस्तूत शोधनिवंधासाठी ग्रंथालयीन अभ्यास पध्दती प्रमाण मानून शोधनिवंधाच्या गरजेप्रमाणे आवश्यक त्या ठिकाणी वर्णनात्मक / विश्लेषनात्मक अभ्यास पध्दतीचा स्वीकार करण्यात आला.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तूत ठिकाणी संशोधकाने संशोधन पध्दतीचा वापर करून शोध निवंधाच्या अनुषंगाने पुढील वावीचे विवेचन केले आहे.

प्रादेशिकता (Regionalism) हा विचार प्रांतवाद, प्रदेशवाद आदी नावांनी ओळखला जातो. प्रादेशिकता म्हणजे काय ? हे पाहावयाचे झाल्यास देशातील एखाद्या विशिष्ट भागावर अथवा राज्यावर अधिक प्रेम करणे किंवा राज्याच्या संदर्भात किंवा राज्यातील एखाद्या विशिष्ट भागावरच प्रेम करणे किंवा संवंधीत मर्यादीत त्या विशिष्ट भागापुरतेच हित पाहणे म्हणजे प्रादेशिकता होय. प्रादेशिकवाद अलिकडच्या राजकारणात प्रभावी मुद्या बनला असून राष्ट्रीय एकात्मतेच्या अनुषंगाने विचार करता प्रादेशिकवाद ही एक समस्या बनलेली आहे. के.एम.पणीकर असे म्हणतात की, "प्रादेशिकतेमुळेच भारतीय लोकशाहीपुढे अनेक समस्या निर्माण झाल्या, राष्ट्रीय दुर्वलता निर्माण करणारा एक दुदैवी घटक म्हणजे प्रादेशिकता होय. हया प्रादेशिकतेमूळे केंद्र आणि घटक राज्य सरकारांच्या संवंधावर विपरीत परिणाम घडत आहे."३ एकंदरीत विचार करता प्रादेशिकता म्हणजे प्रदेशवाद होय याचा साधा सरळ सोप अर्थ म्हणजे आपल्या देशा पेक्षा

ISSN - 2319-5648
Vol 1 Issue VII, Feb. 2016 to July 2016
ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

...ला म्हणतात असे आपणास ढोबळ मानाने म्हणता येते.

**प्रादेशिकतेचा जन्म**

भारतावर जेंव्हा ब्रिटिशांची सत्ता तेंव्हा तत्कालीन काळात ब्रिटिशांनी प्रांताच्या अंतर्गत ...कडे फारसे लक्ष दिले नव्हते. ब्रिटिश शासनाच्या वेळी भारताचे स्वरुप कसे होते तर तेंव्हा ...शाचे प्रदेश, मोगलाचे प्रदेश, संस्थानिकाचे प्रदेश असे तत्कालीन काळातील भारताचे प्रादेशिक स्वरूप होते. मात्र पुढे थोड्याच दिवसानंतर मोगलांचे प्रदेश जेंव्हा ब्रिटिशांनी आपल्या ताब्यात ...यला सुरूवात केली. तेंव्हा पासून भारताच्या भूमित प्रादेशिकतेचा जन्म झाला. थोडक्यात प्रादेशिकतेचा जन्म स्वातंत्र्यावरोबर झालेला असला तरी स्वातंत्र्यपूर्वीही या प्रकारचे विचार आस्तित्वात होते४ असे दिसून येते.

**प्रादेशिकतेला कारणीभूत ठरलेले घटक :**

भारतामध्ये जी प्रादेशिकता जन्मास आली तर नक्कीच तिच्या पाठीशी कांही कारणे आहेत आणि या कारणाच्या आधारावरच भारतात प्रादेशिकवादाचा जन्म झाला. स्वातंत्र्यापूर्वी मर्यादीत असणारी ही संकल्पना स्वातंत्र्यानंतर तीचे मोठ्या प्रश्नात रूपांतर झाले. थोडक्यात 'प्रादेशिकता' हा भारतीय लोकशाही व्यवस्थेतील एक राजकीय प्रश्न आहे. कांही प्रश्नांचा निर्णय आपण सार्वजनिक पातळीवरून घेतो. प्रादेशिकता या राजकीय प्रश्नाला भौगोलिक संदर्भ आहे.५ हा राजकीय प्रश्न समजून घेण्यासाठी भौगोलिक संदर्भासह विविध घटकाचाही कसा परिणाम पडतो हेही समजून घेणे आवश्यक आहे. यात भौगोलिक विविधता, सांस्कृतिक विविधता, धार्मिक विविधता, आर्थिक विषमता आदी कारणे आहेत.

भूविस्तारांच्या दृष्टिने भारत हा मोठा देश आहे. नैसर्गिक साधनसंपतीच्या बाबतीतही भारतात विविधता आहे. नैसर्गिक साधनसंपत्ती मोठ्या प्रमाणात असली तरीही ती निरनिराळ्या भागात विखूरलेली आहे.६ दुसरी एक महत्व बाब म्हणजे अवाढव्य अशा भारतामध्ये भौगोलिक दृष्ट्या एकात्मता नाही त्यामूळे भारतातील प्रत्येक विभाग आपणास इतरापासून वेगळा समजतो. त्यामूळे वेगळेपणाची भावना जास्त प्रमाणात वृध्दींगत होते. उदा. म्हणून तपासले तर महाराष्ट्रातील कोकण, विदर्भ, मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र अशा प्रदेशातील लोक आपणास इतर महाराष्ट्रातील प्रदेशातील लोकापेक्षा वेगळे समजतात. अशीच वेगळेपणाची भावना पंजाब आणि हरियाना या प्रदेशात आढळते. भाषिक प्रांतरचनेमुळे सुध्दा भारतीय जनतेचे पुर्ण समाधान झाले नाही. आजही ही मागणी वाढत जाऊन भारतामध्ये २९ घटकराज्य व ७ केंद्रशासीत प्रदेश तयार झाली असून अजून काही घटकराज्यांची मागणी वाढताना दिसून येते. प्रादेशिकवादाचे दुसरे एक

हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन या भेदाभेद वृत्तीबरोबर आर्य/अनार्य यांचेतील पोटभेद भारतीयांची एकात्मता नष्ट करतात. आर्थिक विषमता हा घटकही प्रादेशिकवादाला खतपाणी घालतो. श्रीमंत आणि गरीब यांच्यामधील वार्षिक उत्पन्नाची सरासरी हयामध्ये जमीन अस्मानचा फरक आहे.७ यामुळेही प्रादेशिकता वाढत आहे. भारतामध्ये प्रादेशिकता वाढण्यासाठी अजून इतर कांही घटकही परिणाम करतात. विशेषतः प्रादेशिक संघटना, राजकीय पक्षांच्या भूमिका, राज्यांचा आर्थिक विकासातील असमानता, असमतोल विकास, भाषिक भेद आदी घटकही प्रादेशिकतेवर परिणाम करतात. त्यामूळे प्रादेशिक असमतोलाचाही विचार करावा लागतो. बिहारमध्ये झारखंडची मागणी करणाऱ्याची हीच तक्रार होती. तर आधप्रदेशात तेलंगनासाठी आंदोलने झाली, शेवटी स्वतंत्र तेलंगणा राज्य निर्माण करावे लागले. कांही प्रदेशांकडे पुरेसे लक्ष दिले नाही, असी कांही राज्यांची तक्रार असते, उद्योगधंदे, शेती विकास, वाहतूक, दळणवळण शेती व उद्योगासाठी वीज, आर्थिक सेवा, बॅका, वित्तीय संस्था यांचे जाळे, खरेदी विक्रीची कार्यक्षम व्यवस्था जिथे या सर्व बाबी विपूल प्रमाणात आहेत तीथे मात्र आर्थिक विकास मोठ्या प्रमाणावर होतो. जीथे या या सुविधा नाहीत तीथे प्रगती खुंटते.८ परिणामी ज्या राज्याचा पूर्ण विकास झालेला नाही तीथे अशा प्रकारचा सुर तयार होतो. पुढे त्यांचे प्रादेशिकतेत रूपांतर होते. एकाच घटकराज्यात सर्व विभागांचा विकास सुध्दा समतोल प्रमाणात होत नाही म्हणून अंधप्रदेशातील तेलांगणा प्रांताने स्वतंत्र घटकराज्याचा तीव्र लढा उभा करून आपली मागणी पदरात पाडून घेतली.

भारतातील प्रादेशिकतेचे स्वरूप पुढील प्रमाणे आढळून येते. ही प्रादेशिकता मुख्यतः तीन प्रकारात आवढळते त्यापैकी पहिले म्हणजे भारतातून फुटून बाहेर पडणे, दुसरे म्हणजे वेगळ्या राज्याची मागणी करणे, तीसरी म्हणजे स्वायत्त राज्याची मागणी करणे. यातील पहिला प्रकार म्हणजे भारतीय संघराज्यातून फुटून बाहेर पडणे हा प्रादेशिकवाद सर्वात उग्र स्वरूपाचा मानला जातो. उदा. आसामधील नागा अंडखोर, मिझोराम मधील मिझोच्या कांही स्वातंत्र्य संघटना निर्माण झाल्या होत्या, परंतू सरकारने अशा चळवळी मोडून काढल्या. भारतातील काही अन्य राज्यांनी असा प्रकारचा प्रादेशिकवाद जोपासला होता. अशा प्रकारचा प्रादेशिकवाद राज्याची एकात्मता व अखंडता भंग करणारा असल्यामुळे त्यांच्याशी कोणताही प्रकारची तडजोड करता येत नाही.९ हा पहिला प्रकार असून दुसरा म्हणजे वेगळ्या राज्याची मागणी करणे होय. एकाच राज्यात पंजाब, हरियाना, आंध्रप्रदेशात, तेलंगणा, महाराष्ट्रात विदर्भ, पुर्वी गुजरात व मुंबईसहीत महाराष्ट्र ही त्याची उतम उदाहरणे आहेत. राज्य पुर्नरचनंतरही ज्यांच्या इच्छा अतृप्त राहिल्या होत्या त्यांनी वेगळ्या राज्याची मागणी पुढे केली.१० तिसरा प्रकार म्हणजे स्वतंत्र स्वायत्त ... मांडले आहेत.

ISSN - 2319-8648
Vol I Issue VII, Feb. 2016 to July 2016

तामिळनाडूने तर राजमन्नार समिती नेमली होती. विविधतेत एकता निर्माण करताना राज्याच्या स्वायत्तेवर मर्यादा पडणे स्वभाविक आहे. भारतात हिमाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपूरा, गोवा, दीव-दमण आदिनी लोकसंख्या व प्रदेशाच्या आधारे आपली मागणी मागीतलेली होती. तात्पर्य अशा प्रकारे भारतीय प्रादेशावादाचे स्वरूप असून आलिकडे प्रदेशवाद अधुन मधून डोकेवर काढतो.

## संदर्भ सूची

१) प्रा.पाटील बी.बी., प्रा.चव्हाण उर्मिला, (२००३), भारतीय शासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर पृष्ठ १६८.
२) प्रा.पाटील बी.बी., प्रा.चव्हाण उर्मिला, पुर्वोक्त पृष्ठ १६८.
३) प्रा.घांगरेकर / कवठाळकर (१९९६), भारतीय राजकीय व्यवस्था, दत्त सन्स नागपूर, पृष्ठ ३.
४) प्रा.बोराळकर, कृ.दी. चोपडे, जोशी, (१९८९), भारतीय राजकीय व्यवस्था, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर, पृष्ठ १३४.
५) लोटे रा.ज. (१९९५), भारतीय संविधान आणि राजकारण, पिंपळापुरे ॲंड कं. पब्लिशर्स, नागपूर पृष्ठ १२९.
६) नवलगुंदरकर श.ना. (२००१), सुलभ राज्यशास्त्र, अनमोल प्रकाशन, पुणे पृष्ठ २१०.
७) प्रा.घांगरेकर / कवठाळकर पुर्वोक्त पृष्ठ ४०४.
८) प्रा.बोराळकर कृ.दी. (१९९८), राज्यशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृष्ठ १६६.
९) प्रा.इंगोले व्ही.एन., प्रा.एरंडे व्ही.एल. (१९९८), भारतीय शासन आणि राजकारण, कल्पना प्रकाशन, नांदेड.
१०) प्रा.बोरळकर, चोपडे, जोशी पुर्वोक्त पृष्ठ १४२.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded